महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी,
मुंबई मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध
योजनांचे पुनर्विलोकन करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः उसाअ २०१६/प्र.क्र.६(सुधा-१)/कार्या-४,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०५ ऑक्टोबर, २०१६

**वाचा -**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : इयुए-१०७५/एल-जेजे, दि.१६.४.१९७५
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : उपूयो-२००२/प्र.क्र.३६/सां.का-५, दि.२२/११/२००२.
३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : उसाअ-२०१०/प्र.क्र.०२/१० का-६, दि.१२/०३/२०१०
४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : उसाअ-२०१०/प्र.क्र.०९/१० का-६, दि.२३/०२/२०११
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : उसाअ-२०१३/प्र.क्र.३५/उसाअ, का-६, दि.३१/१०/२०१४
६) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : उसाअ-२०१५/प्र.क्र.०२/उसाअ, का-४, दि.३०/०७/२०१५
७) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्रमांक : उसाअ-२०१५/प्र.क्र.०३/उसाअ, का-४, दि.१२/०८/२०१५

**प्रस्तावना :**

वरील संदर्भ क्र.१ येथे उल्लेखित शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई ची स्थापना करण्यात आलेली असून सदर शासन निर्णयात महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या स्थापनेची उद्दिष्टे नमूद करण्यात आलेली आहेत. सदर उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी तसेच, उर्दु भाषेच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत विविध योजना राबविण्यात येतात. सदर अकादमीची उद्दिष्टे व अकादमीमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा घेऊन त्यात आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची उद्दिष्टे व सदर अकादमीमार्फत उर्दू भाषेच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनासंदर्भात यापुर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय/आदेश/परिपत्रक अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची पुढील नमूद उद्दिष्टे निश्चित करण्याचा व महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीमार्फत पुढील योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे-

**<u>महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीची उद्दिष्टे</u>** : महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील.

१) इम्कान त्रैमासिकाचे प्रकाशन,

२) राज्य व जिल्हा स्तरावर चर्चासत्रे,

३) उर्दु महेफिले, मुशायरा आदीचे आयोजन करणे,

४) उर्दु शाळा व महाविद्यालयांना वाङ:मयीन कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सहाय्यक अनुदान मंजूर करणे,

५) उर्दु ग्रंथालयांना व ज्या ग्रंथालयांमध्ये उर्दु भाषेची पुस्तके ठेवण्यात येतात अशा ग्रंथालयांना नियतकालिके व पुस्तकांच्या स्वरुपात सहाय्यक अनुदान मंजूर करणे,

६) उर्दु नाटय/एकांकिका महोत्सव आयोजित करणे,

७) नाटय कार्यशाळेचे आयोजन करणे,

८) नाटय एकांकिका लेखकास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने पारितोषिक देणे,

९) उर्दु पुस्तकांना तसेच मराठी-उर्दु अनुवादनाच्या पुस्तकांना प्रकाशनासाठी आर्थिक मदत करणे,

१०) उर्दु पुस्तकासाठी पारितोषिके देणे,

११) १०वी, १२वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दु विषयात तसेच उर्दु माध्यमात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे,

१२) शासन मान्य उर्दु ग्रंथालयांना तसेच, सर्वसाधारण स्वरुपाच्या ज्या शासन मान्य ग्रंथालयांमध्ये उर्दु शाखा अस्तित्वात आहेत, अशा ग्रंथालयांना उर्दु पुस्तके/नियतकालिके

उपलब्ध करुन देणे,

१३) उर्दु पत्रकारांसाठी दरवर्षी कार्यशाळेचे आयोजन करणे,

१४) उर्दु भाषा शिकण्याची इच्छा असणाऱ्या लोकांसाठी उर्दु वर्ग सुरु करणे.

२. <u>महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत राबवावयाच्या योजना</u> : महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीच्या वर नमूद उद्दीष्टांची पूर्तता करण्यासाठी अकादमीमार्फत पुढील योजना राबविण्यात येतील -

**२.१ <u>योजना क्र. (१) : इमकान या त्रैमासिकाचे प्रकाशन</u> :-**

"इमकान या त्रैमासिकाचे प्रकाशन करणे" हे महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीच्या स्थापने मागील उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट आहे. विविध साहित्यिक लेखक/कवी/विचारवंत यांचे लेख/कविता तसेच अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्यक्रमाचा तपशील या त्रैमासिकामध्ये छापला जातो. सध्या हे अंक पुस्तक मालिकेच्या (किताबी सिलसिला) स्वरुपात प्रसिध्द केले जात आहे. उर्दु अकादमीमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना व कार्यक्रमाबाबतचा तपशील प्रसिध्द करण्यासाठी हे एक प्रभावी माध्यम असल्याने तसेच उर्दु भाषेच्या विकासात या इमकानच्या प्रकाशनाद्वारे उर्दु अकादमीचा प्रत्यक्ष हातभार लागत असल्यामुळे याचे नियमितरित्या प्रकाशन होण्याची नितांत आवश्यकता आहे. सदर बाब विचारात घेता इमकान या मासिकाच्या प्रकाशनासाठी पुढीलप्रमाणे योजना विहित करण्यात येत आहे -

- महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत इमकान या त्रैमासिकाचे वर्षातून ४ अंक प्रकाशीत करण्यात यावेत.
- सर्व सामान्यपणे एका अंकाच्या ५०० प्रती छापल्या जाव्यात.
- एका अंकाच्या छपाईची खर्च मर्यादा रु.१,००,०००/- इतकी असेल. यामध्ये लेखकांचे/ उपसंपादकांचे मानधन, उर्दु डी.टी.पी. व मुख्यपृष्ठाची छपाई इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.४ लक्ष.)**

**२.२ <u>योजना क्र.(२) : उर्दु मुशायरा आयोजित करणे</u> :-**

२.२.१ पुढे नमूद सर्व मुशायऱ्यांचे आयोजन खुद्द महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीने करावे.

२.२.२ प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी गेट वे ऑफ इण्डिया, मुंबई येथे आयोजित केल्या जाणाऱ्या मुशायऱ्याकरिता रु.१५ लाख अशी खर्चाची मर्यादा ठेवण्यात यावी. सहभागी होणाऱ्या कवींना येण्या जाण्याचे रेल्वेच्या वातानुकूलित दुसऱ्या वर्गाचे (AC-२) प्रत्यक्ष भाडे देण्यात यावे व त्यांच्या कार्यक्रमाच्या दिवसासाठी निवासाची व जेवणाची उत्तम सोय करण्यात यावी.

२.२.३ लहान स्तरीय कार्यक्रमांचे आयोजन बंद करुन त्याऐवजी राज्यातील कोणत्याही ४ शहरांमध्ये रु.३ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असलेल्या मुशायऱ्यांचे आयोजन करण्यात यावे. प्रत्येक वर्षी वेगळी शहरे निवडण्यात यावीत व एका शहरात लागोपाठ २ पेक्षा अधिक वर्षी मुशायऱ्यांचे आयोजन करण्यात येऊ नये, जेणे करुन राज्यभर दर्जेदार मुशायऱ्यांचे आयोजन करणे शक्य होईल व त्यास उर्दु भाषिक कवींबरोबरच आम जनतेचादेखील सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

२.२.४ सहभागी होणाऱ्या कवींना येण्या जाण्याचे रेल्वेच्या वातानुकूलित दुसऱ्या वर्गाचे (AC-२) प्रत्यक्ष भाडे देण्यात यावे व त्यांच्या कार्यक्रमाच्या दिवसासाठी निवासाची व जेवणाची उत्तम सोय करण्यात यावी.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.२७ लक्ष.)**

**२.३ योजना क्र.(३) : राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय कार्यशाळा/सेमिनार व उर्दू-मराठी सेमिनार आयोजित करणे :-**

२.३.१ राज्यातील कोणत्याही २ शहरांमध्ये प्रत्येकी रु.३ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असलेले दर्जेदार सेमीनार, साहित्यिक कार्यक्रमांचे खुद्द उर्दु अकादमीमार्फत आयोजन करण्यात यावे. कार्यक्रमांच्या आयोजनात विद्यापीठ/महाविद्यालयांची मदत घेण्यात यावी. या कार्यक्रमांमध्ये उर्दु-मराठी साहित्याच्या आदान प्रदानावर भर देण्यात यावे, जेणे करुन दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करणे शक्य होईल व त्यास उर्दु भाषिक लेखकांबरोबरच आम जनतेचादेखील सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

२.३.२ कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या तज्ञ मार्गदर्शक/लेखक/अनुवादकांना येण्या जाण्याचे रेल्वेच्या वातानुकूलित दुसऱ्या वर्गाचे (AC-२) प्रत्यक्ष भाडे व मानधन देण्यात यावे व त्यांच्या कार्यक्रमाच्या दिवसासाठी निवासाची व जेवणाची उत्तम सोय करण्यात यावी.

२.३.३ राज्यातील कोणत्याही ५ शहरांमध्ये प्रत्येकी रु.२ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असलेले "मुसन्निफ से मुलाकात (Meet the Writer)" कार्यक्रमांचे खुद्द उर्दु अकादमीमार्फत आयोजन करण्यात यावे. या कार्यक्रमांमध्ये २ ते ३ नामवंत व प्रसिध्द उर्दु लेखक व मराठी-उर्दु अनुवादकांना निमंत्रित करुन त्यांच्या जाहीर मुलाखतींचे आयोजन करण्यात यावे. निमंत्रित लेखक/अनुवादकाने विद्यार्थ्यांना/ उपस्थितांना आपल्या लेखन क्षेत्राचा प्रकार, आपले अनुभव, साहित्यनिर्मितीचे बारकावे, विषयाची निवड कशी करावी, लेखन कलेच्या तांत्रिक बाबी, इ. बाबत तपशील सांगावा/मार्गदर्शन करावे व तद्नंतर उपस्थितांच्या प्रश्नाची उत्तरे द्यावी.

२.३.४ सहभागी होणाऱ्या लेखक/कवी/अनुवादकांना येण्या जाण्याचे रेल्वेच्या वातानुकूलित दुसऱ्या वर्गाचे (AC-२) प्रत्यक्ष भाडे व मानधन देण्यात यावे व त्यांच्या कार्यक्रमाच्या दिवसासाठी निवासाची व जेवणाची उत्तम सोय करण्यात यावी. अशा प्रकारच्या दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्यास त्यास उर्दु भाषिक लेखकांबरोबरच आम जनतेचादेखील सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.१६ लक्ष.)**

२.४ **योजना क्र.(४) : उर्दु भाषा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उर्दु शाळा व महाविद्यालयांना व ज्या महाविद्यालयांत उर्दु भाषा शिकविली जाते अशा महाविद्यालयांना अनुदान मंजूर करणे :-**

सदर योजनेअंतर्गत शाळा/महाविद्यालयाच्या स्तरावर पुढील प्रकारचे वाङ:मयीन कार्यक्रम आयोजित करण्यात यावे -

- वादविवाद स्पर्धा
- शायरी स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा
- रोल प्ले नॉटक
- क्रिएटिव्ह राईटिंग वर्कशॉप.

वर नमूद स्वरुपाच्या वाङ:मयीन कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे/ पुरस्कारांचे वाटप करण्यासाठी एकूण १०० शाळांना प्रत्येकी रु.५,०००/- व एकूण ५० महाविद्यालयांना प्रत्येकी रु.१०,०००/- इतके अनुदान देण्यात येईल.

२.४.१ या योजनेंतर्गत सहभागी होण्याकरिता वर्तमानपत्रात जाहिराती देऊन शाळा/ महाविद्यालयांकडून नामांकने मागविण्यात यावीत. प्राप्त झालेल्या नामांकनामधून शाळा/ महाविद्यालयांची अकादमीच्या बैठकीत निवड करुन त्यास मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, यांची मान्यता घेण्यात यावी.

२.४.२ या योजनेअंतर्गत शालेय स्तरावर वर नमूद प्रकारांपैकी किमान २ प्रकाराच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. शक्यतोवर कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम ठेवण्यात येऊन त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत.

२.४.३ या योजनेअंतर्गत महाविद्यालयांच्या स्तरावर क्रिएटिव्ह राईटिंग वर्कशॉप चे आयोजन करण्यात यावे. सदर वर्कशॉप मध्ये तज्ञ, लेखक किंवा शायर यांना आमंत्रित करण्यात यावे. त्यांना येण्या जाण्याचे रेल्वेच्या वातानुकूलित दुसऱ्या वर्गाचे (AC-२) प्रत्यक्ष भाडे व मानधन देण्यात यावे व कार्यक्रमाच्या दिवसासाठी त्यांच्या निवासाची व जेवणाची उत्तम सोय करण्यात यावी. त्यांनी सदर वर्कशॉप मध्ये येऊन साहित्य निर्मितीबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी. (Students participatory scheme).

२.४.४ या योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी वेगळ्या शाळा/महाविद्यालय निवडण्यात यावी व एका शाळा/ महाविद्यालयात लागोपाठ २ पेक्षा अधिक वर्षी या योजनेंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये, जेणे करुन राज्यभरातील सर्व पात्र शाळा/महाविद्यालयांना या योजनांचा लाभ घेता येईल.

२.४.५ सदर योजना तसेच, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी मार्फत राबविण्यात येणाऱ्या अन्य कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी/योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित शाळा/

महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक राहील व यासाठी अर्ज करता शाळांनी त्यांचे DIES क्रमांक नमूद करणे बंधनकारक असेल.

| अ. क्र. | वर्ग | शाळांची/ महाविद्यालयांची संख्या | महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीकडून अनुदान (प्रत्येक शाळा/महाविद्यालयास) |
|---|---|---|---|
| १ | शाळा (इयत्ता १० वी व १२ वी पर्यंत) | १०० शाळा | रु. ५,०००/- |
| २ | महाविद्यालय - (पदवी अभ्यासक्रम) | ५० महाविद्यालय | रु.१०,०००/- |

( **योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु. १० लक्ष.** )

२.५ **योजना क्र.(५) : ग्रंथालयांना उर्दु नियतकालिके व पुस्तके पुरविणे :-**

२.५.१ सदर योजनेंतर्गत राज्यातील शासन मान्यताप्राप्त व नोंदणीकृत उर्दु ग्रंथालयांना व ज्या शासन मान्यताप्राप्त व नोंदणीकृत ग्रंथालयांमध्ये उर्दु भाषेची पुस्तके ठेवण्यात येतात, अशा ग्रंथालयांना विवक्षीत पुस्तके व मासिके पुरविण्यात यावीत.

२.५.२ पुरविण्यात येणारी पुस्तके व नियतकालिकांच्या यादीला शासनाची मान्यता घेण्यात यावी व केवळ या मंजूर यादीतील पुस्तके व नियतकालिके सदर योजनेअंतर्गत पुरविण्यात यावीत.

२.५.३ सदर पुस्तके ज्या ग्रंथालयांना पुरवावयाची आहेत त्या ग्रंथालयांच्या यादीला देखील शासनाची मान्यता घेण्यात यावी व केवळ या मंजूर यादीतील ग्रंथालयांनाच सदर योजनेअंतर्गत पुस्तके व नियतकालिके पुरविण्यात यावीत.

२.५.४ सद्य:स्थितीत एकूण १५ पुस्तके/नियतकालिके यांच्या यादीस व एकूण ३५० ग्रंथालयांच्या यादीस शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या दोन्ही याद्या पुढील आदेशापर्यंत कायम करण्यात येत आहेत. तथापि, बाजारात येणाऱ्या नवीन पुस्तकांचा वेळोवेळी समावेश करण्याची कार्यवाही करावी.

२.५.५ पुस्तके व नियतकालिकांची किंमत अकादमीकडून थेट प्रकाशकांना अदा केली जावी.

२.५.६ सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी/योजनेत सहभागी होण्यासाठी शाळा वा महाविद्यालयातील ग्रंथालयाकडून अर्ज करण्यात आल्यास, संबंधित शाळा/ महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त

असणे आवश्यक राहील व यासाठी अर्ज करता शाळांनी त्यांचे DIES क्रमांक नमूद करणे बंधनकारक असेल.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.१० लक्ष.)**

**२.६ योजना क्र.(६) : उर्दु नाट्य महोत्सव आयोजित करणे, तसेच नाट्य/एकांकिका लेखकास उत्तेजनार्थ पारितोषिके देणे :-**

२.६.१ महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीतर्फे प्रत्येक वर्षी राज्यातील कोणत्याही एका शहरात एक आठवडयाचे “नाट्य महोत्सव” (ड्रामा फेस्टिवल) आयोजित करण्यात यावे. हे महोत्सव मुंबई किंवा राज्यातील अन्य कोणत्याही शहरांत आयोजित करण्यात यावे. यावरील खर्चाची कमाल मर्यादा रु.२५ लाख इतकी असावी. चांगले, दर्जेदार व व्यवसायिक ग्रुप्स ना यामध्ये निमंत्रीत करावे/सहभागी करुन घेण्यात यावे.

२.६.२ या योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी वेगळी शहरे निवडण्यात यावीत व एका शहरात लागोपाठ २ पेक्षा अधिक वर्षी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येऊ नये, जेणे करुन राज्यभरातील सर्व शहरांत नाट्य महोत्सवाचे आयोजन करणे शक्य होईल.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.२५ लक्ष.)**

**२.७ योजना क्र.(७) : उर्दु नाट्य कार्यशाळेचे आयोजन करणे :-**

२.७.१ राज्यातील ज्या विद्यापिठांमध्ये परफार्मिंग आर्टस शाखा असेल, अशा विद्यापिठांना (वर्षाला कमाल २) परफार्मिंग आर्टस शाखेच्या मार्गदर्शनाखाली विद्यापिठाच्या स्तरावर उर्दु नाटकांची एक आठवडयाची कार्यशाळा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत रु.२.५ लाख इतके अनुदान देण्यात यावे.

२.७.२ या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना नाटक सादर करण्याची कला, बारकावे व तांत्रिक बाबी, अदाकारी व दिग्दर्शन इ. बाबी शिकविण्यात याव्यात/मार्गदर्शन करण्यात यावे. कार्यशाळेच्या शेवटी मार्गदर्शकांना, भाग घेणाऱ्यांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे/पारितोषिके देण्यात यावीत.

२.७.३ सदर योजनेचा सहभागी होण्यासाठी अर्ज सादर करणारे महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक राहील व यासाठी अर्ज करताना महाविद्यालयांनी त्यांचे ओळखपत्र क्रमांक (ID)नमूद करणे बंधनकारक असेल.

२.७.४ या योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी वेगळी विद्यापिठे निवडण्यात यावीत व एका विद्यापिठात लागोपाठ २ पेक्षा अधिक वर्षी नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येऊ नये, जेणे करुन राज्यभरातील सर्व विद्यापिठांत (परफार्मिंग आर्टस शाखा असलेल्या) नाट्य कार्यशाळांचे आयोजन करणे शक्य होईल.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.५ लक्ष.)**

**२.८ योजना क्र.(८) : उर्दु पुस्तकांना तसेच मराठी ते उर्दु अनुवादनाच्या पुस्तकांना प्रकाशनासाठी आर्थिक मदत करणे :-**

२.८.१ महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेंतर्गत उर्दू भाषेतील लेखक/कवी/विचारवंत/मराठी-उर्दु अनुवादक यांना त्यांच्या साहित्यिक कृतींच्या प्रकाशनासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद वर्गवारीत पुस्तकांची विभागणी करण्यात यावी. कोणती पुस्तके अनुवादित करावयाची आहेत हे तज्ञांमार्फत ठरविण्यात यावे तसेच, पुस्तकांच्या पानांच्या संख्येवरुन मानधन ठरविण्यात यावे.

| अ.क्र. | पुस्तकांची वर्गवारी |
|---|---|
| १. | टिकात्मक/संशोधन/ऐतिहासिक |
| २. | आत्मचरित्रे/प्रवास वर्णन/विज्ञान/तांत्रिक/खेळ |
| ३. | कथा/कादंबरी/नाटय लेखन/इतर |
| ४. | काव्यसंग्रह |
| ५. | हास्यव्यंग/विनोदी लेखन |
| ६. | अनुवाद/निबंध/अफसाना/संग्रह |
| ७. | बाल-साहित्य |

२.८.२ अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी पुस्तकांची (हस्तलिखित) निवड करण्याकरिता वर नमूद प्रत्येक वर्गवारीतून २ या प्रमाणात तज्ञ परिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

२.८.३ वर नमूद केल्याप्रमाणे नियुक्त केल्या जाणाऱ्या परिक्षकांना मानधन, प्रवास खर्च व राहण्याचा व जेवणाचा खर्च म्हणून ठोक रु.१०,०००/- प्रत्येकी अनुज्ञेय असेल.

२.८.४ परिक्षकांनी निवड केलेल्या हस्तलिखित प्रकाशनासाठी अर्थसंकल्पिय तरतुदीच्या मर्यादेत राहून अर्थसहाय्य मंजूरीचे अधिकार अकादमीच्या कार्यकारी मंडळास राहतील.

२.८.५ परिक्षकांनी संमती दिलेल्या हस्तलिखितांच्या लेखकांकडून हस्तलिखितांची डिटीपी प्राप्त झाल्यानंतरच अर्थसहाय्याच्या अनुदानाची रक्कम देण्यात यावी.

२.८.६ ज्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले जाईल ते अनुदान त्याच पुस्तकाच्या प्रकाशनासाठी वापरण्यात येत आहे, हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांची राहील.

२.८.७ अकादमीला सादर करण्यात आलेल्या हस्तलिखितामध्ये कुठल्याही प्रकारचा फेरबदल करण्यात येवू नये. तसे करावयाचे असल्यास त्यासाठी उर्दू अकादमीची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील. तसेच पुस्तकाच्या सुरुवातीच्या आतील प्रथम पृष्ठांवर या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीतर्फे सहायक अनुदान मिळाल्याबाबतची नोंद असणे आवश्यक असेल.

२.८.८ अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठी पुस्तकांची निवड करताना पुस्तकांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करण्यात येऊ नये. एखाद्या वर्षी एखाद्या वर्गवारीतून अर्थसहाय्य देण्याच्या पात्रतेचे पुस्तक आढळून न आल्यास त्या वर्गवारीतून अर्थसहाय्य प्रदान करणे आवश्यक राहणार नाही.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.६ लक्ष.)**

**२.९ <u>योजना क्र.(९) : उर्दु भाषेतील कवी/लेखक/विचारवंत यांच्या पुस्तकांना पारितोषिके देणे</u> :-**

२.९.१ उर्दु भाषेतून प्रसिध्द होणाऱ्या पुस्तकांची वरील योजना क्र.८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण ७ वर्गवारीत विभागणी करण्यात आलेली आहे.

२.९.२ वर नमूद प्रत्येक वर्गवारीतून कमाल ३ पुस्तकांना महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत प्रत्येकी रु.१५,०००/- ठोक रक्कमेची (इ.सी.एस.द्वारे प्रदान) पारितोषिके देण्यात यावीत.

२.९.३ उर्दू भाषेतील लेखक/कवी/विचारवंत यांच्या दरवर्षी जानेवारी ते डिसेंबर (कॅलेंडर वर्ष) या कालावधीत प्रकाशित झालेल्या पुस्तकांमधून पात्र पुस्तकांची पारितोषिकांसाठी निवड करण्यात यावी.

२.९.४ पारितोषिके मंजूर करण्यासाठी पुस्तकांची निवड करण्याकरिता वर नमूद प्रत्येक वर्गवारीतून ३ या प्रमाणात तज्ञ परिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

२.९.५ वर नमूद केल्याप्रमाणे नियुक्त केल्या जाणाऱ्या परिक्षकांना मानधन, प्रवास खर्च व राहण्याचा व जेवणाचा खर्च म्हणून ठोक रु.१०,०००/- प्रत्येकी अनुज्ञेय असेल.

२.९.६ पुरस्कार देण्यासाठी पुस्तकांची निवड करणारे परीक्षक हे नामवंत लेखक असायला हवेत.

२.९.७ पुरस्कार देण्यासाठी पुस्तकांची निवड करताना पुस्तकांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करण्यात येऊ नये. एखाद्या वर्षी एखाद्या वर्गवारीतून पुरस्कार देण्याच्या पात्रतेचे पुस्तक आढळून न आल्यास त्या वर्गवारीतून पुरस्काराचे प्रदान करणे आवश्यक राहणार नाही.

२.९.८ सदर योजनेंतर्गत पारितोषिके प्राप्त करण्यासाठी पुस्तके पाठविण्याविषयीच्या प्राथमिक अटी, शर्ती आणि कार्यपध्दती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट "अ"** मध्ये नमूद करण्यात आलेल्या असून या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व लेखक/कवी/विचारवंत यांनी या अटी, शर्ती व कार्यपध्दतीचे अवलंब करणे बंधनकारक राहील व अन्यथा त्यांच्या पुस्तकांना या योजनेत समाविष्ट केले जाणार नाही.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.६ लक्ष.)**

**२.१० <u>योजना क्र.(१०)</u> : <u>१०वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दु विषयात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे</u> :-**

अकादमीच्या सदर उद्दीष्टाच्या पूर्तीकरिता सद्य:स्थितीत सुरु असलेल्या योजनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत -

२.१०.१ प्रत्येक वर्षी राज्यातील सर्व ८ शिक्षण मंडळाकडून १०वी व १२वी वर्गाच्या अंतिम परिक्षेमध्ये, तसेच राज्यातील सर्व ८ विद्यापिठांकडून पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये उर्दु विषयात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे मागविण्यात यावीत व त्यांना पुढील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पारितोषिके प्रदान करण्यात यावीत.

**(अ) १०वी, १२वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दु भाषेत पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे :-**

| अ.क्र. | वर्ग | सध्याचे पारितोषिक | प्रस्तावित सुधारित पारितोषिक |
|---|---|---|---|
| १ | १० वी व १२ वी - प्रथम क्रमांकाचे गुण | रु.३,०००/- | रु. ५,०००/- |
| २ | १० वी व १२ वी - द्वितीय क्रमांकाचे गुण | रु.२,०००/- | रु. ३,०००/- |
| ३ | १० वी व १२ वी - तृतीय क्रमांकाचे गुण | - | रु.२,०००/- |
| ४ | पदवी व पदव्युत्तर - प्रथम क्रमांकाचे गुण | रु.५,०००/- | रु. ७,०००/- |
| ५ | पदवी व पदव्युत्तर - द्वितीय क्रमांकाचे गुण | रु.४,०००/- | रु. ५,०००/- |
| ६ | पदवी व पदव्युत्तर - तृतीय क्रमांकाचे गुण | - | रु. ३,०००/- |
| **टीप :** उपरोक्त पारितोषिकांच्या रकमेचे प्रदान केवळ ई.सी.एस. पध्दतीने करण्यात यावे. | | | |

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.२ लक्ष.)**

**(ब) १०वी, १२वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दु माध्यमात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे :-**

२.१०.२ प्रत्येक वर्षी राज्यातील सर्व ८ शिक्षण मंडळाकडून **उर्दु माध्यमांतून** १०वी व १२वी वर्गामध्ये तसेच राज्यातील सर्व ८ विद्यापिठांकडून उर्दु माध्यमांतून पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे मागविण्यात यावीत व त्यांना पुढील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पारितोषिके प्रदान करण्यात यावीत-

| अ.क्र. | वर्ग | प्रस्तावित पारितोषिक |
|---|---|---|
| १ | १० वी व १२ वी - प्रथम क्रमांकाचे गुण | रु. १०,०००/- |
| २ | १० वी व १२ वी - द्वितीय क्रमांकाचे गुण | रु. ८,०००/- |
| ३ | १० वी व १२ वी - तृतीय क्रमांकाचे गुण | रु. ५,०००/- |
| ४ | पदवी व पदव्युत्तर - प्रथम क्रमांकाचे गुण | रु. १०,०००/- |
| ५ | पदवी व पदव्युत्तर - द्वितीय क्रमांकाचे गुण | रु. ८,०००/- |
| ६ | पदवी व पदव्युत्तर - तृतीय क्रमांकाचे गुण | रु. ५,०००/- |
| **टीप :** उपरोक्त पारितोषिकांच्या रकमेचे प्रदान केवळ ई.सी.एस. पध्दतीने करण्यात यावे. | | |

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.४ लक्ष.)**

**२.११ योजना क्र.(११) : उर्दु पत्रकारांसाठी दरवर्षी कार्यशाळेचे आयोजन करणे.**

सदर योजनेअंतर्गत प्रत्येक वर्षी राज्यातील कोणत्याही एका शहरात उर्दु पत्रकारांसाठी एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यशाळेत तज्ञ पत्रकारांकडून नवोदित पत्रकारांना पत्रकारितेबद्दल मार्गदर्शन करण्यात यावे. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या पत्रकारांना येण्या जाण्याचे रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचे (स्लीपर) प्रत्यक्ष भाडे देण्यात यावे व त्यांच्या कार्यशाळेच्या दिवसासाठी निवासाची व जेवणाची सोय करण्यात यावी. कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या पत्रकारांना त्याबद्दल प्रमाणपत्रे प्रदान करण्यात यावीत.

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.२ लक्ष.)**

**२.१२ योजना क्र.(१२) : उर्दु भाषेमधील उल्लेखनिय कामगिरीबद्दल पारितोषिके प्रदान करण्याबाबत :-**

सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्र उर्दु अकादमीमार्फत विविध स्वरुपाचे पुरस्कार / पारितोषिके देण्यात येतात. या पुरस्कारांची आखणी व रुपरेषा प्रभावी व सुटसुटीत करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**२.१२.१ "शोध व निवड समिती" :-** उर्दु भाषेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांसाठी पात्र व्यक्तींची निवड करण्यासाठी मा.मंत्री (अल्पसंख्यांक) व पदसिध्द अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी यांच्या मान्यतेने पुढीलप्रमाणे "शोध व निवड समिती" गठित करण्यात यावी -

१. मुंबई, नागपूर व औरंगाबाद विद्यापिठातील उर्दु विभागाचे प्रमुख (एकूण ३ सदस्य)
२. उर्दु भाषेतून लिखाण करणारे नामवंत साहित्यीक (लेखक/कवी) (एकूण ३ सदस्य)
३. मा.मंत्री (अल्पसंख्याक) व पदसिध्द अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी यांच्या मान्यतेने, वरील मुद्दा क्र.२ येथे नमूद ३ सदस्यांपैकी १ किंवा अ.क्र.१ येथे नमूद ३ सदस्यांपैकी सेवा कालावधीनुसार ज्येष्ठ असलेले सदस्याची "शोध व निवड समिती" चे अध्यक्ष म्हणून राहतील.
४. कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी व उर्दु अकादमीचे अन्य एक सदस्य (एकूण २ सदस्य)

५. अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई येथील उर्दु अकादमीचे काम पहाणारे प्रभारी सहसचिव/उपसचिव (एकूण १ सदस्य)

६. अधिक्षक नि कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई हे सदर समितीचे सचिव राहतील.

७. सचिव हे प्रत्येक वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात वर्तमानपत्रात जाहिरात देवून पुरस्कारांसाठी नामांकन/शिफारशी मागवतील.

८. अशा प्रकारे अकादमी कार्यालयात प्राप्त होणाऱ्या सर्व नामांकन/शिफारशींची प्राथमिक तपासणी करुन सदस्य सचिव हे त्यांचा एक गोषवारा तयार करतील.

९. सदस्य सचिव हे प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात उपरोक्त समितीची बैठक बोलावून सदर गोषवारा समितीपुढे ठेवतील.

१०. समिती आपल्या पहिल्या बैठकीत, पुरस्कार प्रदान करण्यासाठी पात्र उमेदवारांची शोध व निवड प्रक्रिया पार पाडण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीसंदर्भात आवश्यक वाटणारी नियमावली विहित करेल.

११. सर्व नामांकने/शिफारशी यांची साकल्याने तपासणी करुन समिती पुरस्कार प्रदान करण्याविषयीच्या आपल्या शिफारशींचा कारणमिमांसह अहवाल तयार करुन सदर अहवाल शासनास सादर करेल.

१२. प्राप्त झालेली नामांकने/शिफारशी हून भिन्न अशा नांवांची शिफारस करण्याचा देखील सदर समितीस अधिकार असेल.

१३. सदर समितीने जास्तीत जास्त तीन बैठकांमध्ये, शक्य तो वर लागोपाठ च्या दिवसात, शोध व निवड प्रक्रिया पार पाडून आपल्या शिफारशी शासनास सादर कराव्या.

१४. समितीच्या बैठकीत उपस्थित राहणाऱ्या सदस्यांपैकी जे सदस्य शासकीय सेवेत आहेत, अशा सदस्यांना त्यांच्या सेवा नियमांनुसार अनुज्ञेय असणाऱ्या दराने दैनिक भत्ता व प्रवास भत्ता अनुज्ञेय असेल. इतर अशासकीय सदस्यांना शासनाच्या वर्ग-अ अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने महागाई भत्ता तसेच त्यांच्या निवासाच्या शहरापासून मुंबईला रेल्वेच्या एसी-२ श्रेणीने येण्या जाण्याचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

१५. समितीच्या बैठकींना प्रत्यक्ष हजर राहून शोध व निवड प्रक्रिया पार पाडणाऱ्या प्रत्येक सदस्याला रु.५,०००/- इतके मानधन अनुज्ञेय असेल.

१६. समितीने सादर केलेल्या शिफारशींची शासन स्तरावरुन तपासणी करुन सदर शिफारशी मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास) तथा पदसिध्द उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी व मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास) तथा पदसिध्द अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी व मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर करण्यात येतील.

१७. वर नमूद केल्याप्रमाणे शासनाने मान्य केलेल्या शिफारशी व पुरस्कार प्राप्तकर्त्यांची नावे शासनाकडून अकादमी कार्यालयाला कळविण्यात येतील.

१८. एखाद्या पुरस्कारासाठी सुयोग्य उमेदवार उपलब्ध होत नसल्यास गुणवत्तेत कोणतीही तडजोड करण्यात येऊ नये. अशी परिस्थिती उद्भवल्यास त्या वर्षी ते पुरस्कार प्रदान करणे बंधनकारक असणार नाही.

१९. अकादमी कार्यालयाकडून पुरस्कार वितरण सोहळयाचे आयोजन करुन पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

२.१२.२ **<u>महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी मार्फत प्रदान करावयाचे पुरस्कार</u> :** उर्दु भाषेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीतर्फे दर वर्षी पुढे नमूद केल्याप्रमाणे पुरस्कार प्रदान करण्यात येतील -

अ) **मिर्झा गालीब जीवन गौरव पुरस्कार :-** प्रत्येक वर्षी उर्दु भाषेतून लिखाण करणाऱ्या एका सुप्रसिध्द व नामवंत लेखक/साहित्यीक वा शायर यांना त्यांनी साहित्य क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल "मिर्झा गालीब जीवनगौरव पुरस्कार" प्रदान करण्यात यावे. सदर पुरस्कारात इ.सी.एस. द्वारे रु.१ लाख रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ चा समावेश असेल.

**(एकूण वार्षिक खर्च रु.१,००,०००/-).**

ब) **वली दख्खनी पुरस्कार :-** प्रत्येक वर्षी उर्दु भाषेतून लिखाण करणाऱ्या एका महाराष्ट्र

राज्यातील सुप्रसिध्द व नामवंत लेखक/साहित्यीक वा शायर यांना त्यांनी साहित्य क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल "वली दख्खनी पुरस्कार" प्रदान करण्यात यावे. सदर पुरस्कारात इ.सी.एस. द्वारे रु.५१ हजार रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळचा समावेश असेल.

**(एकूण वार्षिक खर्च रु.५१,०००/-)**

क) **नवोदित साहित्यिकांना पुरस्कार** :- उर्दु भाषेतून लिखाण करणाऱ्या नवोदित लेखकांसाठी १ व नवोदित कवींसाठी १ असे एकूण २ "नवोदित साहित्यिक पुरस्कार" देण्यात यावेत. सदर पुरस्कारात इ.सी.एस.द्वारे रु.२५,०००/- रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र शाल व श्रीफळ चा समावेश असेल.

**(एकूण वार्षिक खर्च रु.५०,०००/)**.

**ड) उर्दु पत्रकारिता पुरस्कार** :- राज्यातून उर्दु भाषेतून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रांची संख्या लक्षणीय असल्याने राज्यातील उर्दु पत्रकारांची संख्यादेखील बरीच मोठी आहे. सदर बाब विचारात घेता उर्दु भाषेतून पत्रकारिता करणाऱ्या एकूण ४ पत्रकारांना "उर्दु पत्रकारिता पुरस्कार" प्रदान करण्यात यावेत. सदर पुरस्कारात प्रत्येकी, इ.सी.एस.द्वारे रु.१५,०००/- रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ चा समावेश असेल.

**(एकूण वार्षिक खर्च रु.६०,०००/-).**

इ) **ले-आऊट डिझायनिंग पुरस्कार** :- राज्यातून उर्दु भाषेतून प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे, नियतकालिके इ. च्या उत्कृष्ट ले-आऊट डिझायनिंग साठी १ "उत्कृष्ट ले-आऊट डिझायनिंग पुरस्कार" प्रदान करण्यात यावे. सदर पुरस्कारात इ.सी.एस.द्वारे रु.१५,०००/- रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ चा समावेश असेल.

**(एकूण वार्षिक खर्च रु.१५,०००/-).**

ई) **शिक्षण सेवा पुरस्कार** :- राज्यात उर्दु भाषेतून शिक्षण देणाऱ्या शिक्षकांची संख्या फारच मोठी असल्याने व हे शिक्षक उर्दु भाषेचा प्रचार व प्रसारामध्ये प्रत्यक्ष भूमिका बजावतात ही बाब विचारात घेता, योग्य उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी -

१) विद्यापीठ स्तरावरील ३ उर्दु भाषेच्या प्राध्यापकांना;

२) महाविद्यालय स्तरावरील ३ उर्दु भाषेच्या व्याख्यातांना; व

३) शालेय स्तरावरील १५ उर्दु भाषेच्या शिक्षकांना प्रत्येकी इ.सी.एस.द्वारे रु.१५,०००/- रक्कम, प्रतिकात्मक चेक, मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ चा समावेश असलेले एकूण २१ "शिक्षण सेवा पुस्कार" पुरस्कार प्रदान करण्यात यावेत.

**(एकूण वार्षिक खर्च रु.३,१५,०००/).**

**उ) विशेष पुरस्कार :-** उर्दु भाषेचा प्रचार व प्रसार करण्याच्या क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावणाऱ्या एकूण १० व्यक्तींना विशेष पुरस्काराच्या स्वरुपात रु.१५,०००/- रक्कम इ.सी.एस.द्वारे, प्रतिकात्मक चेक अधिक मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ यांचा समावेश असलेले एकूण १० "विशेष पुरस्कार" प्रदान करण्यात यावेत.

**(एकूण वार्षिक खर्च रु.१,५०,०००/).**

**२.१२.३ पुरस्कार प्राप्त कर्त्यांना अनुज्ञेय भत्ते/सोयी :-**

१) वरील पुरस्कारांपैकी "मिर्झा गालीब जीवनगौरव पुरस्कार" व "वली दख्खनी पुरस्कार" या पुरस्कारांच्या पुरस्कार प्राप्त कर्ते व त्यांची पत्नी/पती यांना त्यांच्या निवासाच्या शहरापासून मुंबईला रेल्वेच्या एसी-२ श्रेणीने येण्या जाण्याचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

२) उर्वरित पुरस्कारांच्या पुरस्कार प्राप्त कर्ते तसेच, १०वी व १२वी परीक्षेत उर्दु भाषा व उर्दु माध्यमातून पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणारे विद्यार्थी व त्यांचे प्रत्येकी एक पालक, यांना त्यांच्या निवासाच्या शहरापासून मुंबईला रेल्वेच्या एसी-३ श्रेणीने येण्या जाण्याचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहील.

३) सर्व पुरस्कारांच्या पुरस्कार प्राप्त कर्त्यांची निवासाची व जेवणाची उत्तम सोय ठेवण्यात यावी.

{पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी हॉलचे भाडे, पुरस्कार वितरण समारंभाचा खर्च, प्रवास भाडे, राहण्याचा व जेवणाचा खर्च, कार्यकर्त्यांचे मानधन, प्रतिकात्मक चेक, मानचिन्हे, प्रमाणपत्रे, शाल, श्रीफळ इ. वरील संकीर्ण स्वरुपाचा खर्च -रु.६,००,०००/-}

**(योजनेवरील एकूण वार्षिक खर्च रु.१४ लक्ष.)**

**<u>महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई</u>**

**<u>मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा गोषवारा.</u>**

| अ.क्र. | उद्दिष्ट / योजना | स्वरुप | अपेक्षित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | इमकान या त्रैमासिकाचे प्रकाशन. | हे अंक पुस्तक मालिकेच्या (किताबी सिलसिला) स्वरुपात प्रसिध्द केले जात आहे. | रु. ४,००,०००/- |
| २ | उर्दु मुशायरा आयोजित करणे. | प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी गेट वे ऑफ इण्डिया, मुंबई येथे मुशायऱ्यांचे आयोजन. (खर्च रु.१५ लाख).<br>याशिवाय, राज्यातील कोणत्याही ४ शहरांमध्ये रु.३ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असेलेले मुशायऱ्यांचे आयोजन. | रु.२७,००,०००/- |
| ३ | राज्यस्तरीय/जिल्हास्तरीय कार्यशाळा/सेमिनार व उर्दू-मराठी संमेलन आयोजित करणे. | राज्यातील कोणत्याही २ शहरांमध्ये रु.३ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असलेले दर्जेदार सेमीनार, साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. त्याचप्रमाणे, राज्यातील कोणत्याही ५ शहरांमध्ये रु.२ लाख इतकी कमाल खर्च मर्यादा असेलेले "मुसन्निफ से मुलाकात (Meet the Writer)" कार्यक्रमांचे आयोजन. | रु.१६,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | उर्दु भाषा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उर्दु शाळा व महाविद्यालयांना व ज्या महाविद्यालयांत उर्दु भाषा शिकविली जाते अशा महाविद्यालयांना अनुदान मंजूर करणे. | • वादविवाद स्पर्धा<br>• शायरी स्पर्धा<br>• निबंध लेखन स्पर्धा<br>• रोल प्ले नॉटक<br>• क्रिएटिव्ह राईटिंग वर्कशॉप .<br>अशा स्वरुपाच्या वाङ:मयीन कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे/ पुरस्कारांचे वाटप करण्यासाठी एकूण १०० शाळांना प्रत्येकी रु.५,०००/- व एकूण ५० महाविद्यालयांना प्रत्येकी रु.१०,०००/- इतके अनुदान. | रु.१०,००,०००/- |
| ५ | उर्दु ग्रंथालयांना नियतकालिके व पुस्तके पुरविणे | या योजनेअंतर्गत सद्य:स्थितीत एकूण ३५० ग्रंथालयांना प्रत्येकी एकूण १५ पुस्तके व नियतकालिके पुरविण्यात येतात. अकादमीकडून पुस्तके व नियतकालिकांची किंमत थेट प्रकाशकांना अदा केली जाते. | रु.१०,००,०००/- |
| ६ | उर्दु नाट्य महोत्सव आयोजित करणे | प्रत्येक वर्षी राज्यातील कोणत्याही एका शहरात एक आठवडयाचे “नाट्य महोत्सव” (ड्रामा फेस्टिवल). चांगले, दर्जेदार व व्यवसायिक ग्रुप्स ना यामध्ये निमंत्रीत/सहभागी करुन घेण्यात यावे.<br>शक्य तोवर प्रत्येक वर्षी वेगळे शहर निवडून राज्यभरातील सर्व शहरांत नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्याचे प्रयत्न. | रु.२५,००,०००/- |
| ७ | उर्दु नाट्य कार्यशाळेचे आयोजन करणे. | ज्या विद्यापिठांमध्ये परफार्मिंग आर्टस शाखा असेल, अशा विद्यपिठांना (वर्षाला कमाल २) परफार्मिंग आर्टस शाखेच्या मार्गदर्शनाखाली विद्यापिठाच्या स्तरावर उर्दु नाटकांची एक आठवडयाची कार्यशाळा आयोजित करण्यासाठी रु.२.५ लाख इतके अनुदान.<br>या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना नाटक सादर करण्याची कला, बारकावे व तांत्रिक बाबी, अदाकारी व दिग्दर्शन इ. बाबी संदर्भात मार्गदर्शन. | रु. ५,००,०००/- |
| ८ | उर्दु हस्तलिखिताचे प्रकाशन तसेच मराठी- उर्दु अनुवादकांना आथिर्क अनुदान देणे | उर्दु हस्तलिखिताचे प्रकाशन तसेच मराठी- उर्दु अनुवादकांना एकूण ७ वर्गवारीत प्रत्येक वर्गाकरिता ३ अशा २१ परक्षिकांना उर्दु अकादमीमार्फत पारितोषिक देण्यात येतात. | रु. ६,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | उर्दु भाषेतील कवी/ लेखक/ विचारवंत यांच्या पुस्तकांना पारितोषिके देणे. | उर्दु भाषेतून प्रसिध्द होणाऱ्या पुस्तकांची एकूण ७ वर्गवारीत विभागणी करण्यात आली असून यापैकी प्रत्येक वर्गवारीतून कमाल ३ पुस्तकांना उर्दु अकादमीमार्फत पारितोषिक देण्यात येतात. | रु. ६,००,०००/- |
| १० | १०वी, १२वी, पदवी व पदव्युत्तर परीक्षांमध्ये उर्दु विषयात पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देणे. | अ) सर्व आठ शिक्षण मंडळात १० वी व १२ वी च्या परीक्षेत उर्दु भाषेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.५,०००/-, रु.३,०००/- व रु.२,०००/- चे पारितोषिक.<br>सर्व आठ विद्यापिठात पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये उर्दु भाषेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.७,०००/-, रु.५,०००/- व रु.३,०००/- चे पारितोषिक.<br>ब) सर्व आठ शिक्षण मंडळात १० वी व १२ वी च्या परीक्षेत उर्दु माध्यमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.१०,०००/-, रु.८,०००/- व रु.५,०००/- चे पारितोषिक.<br>सर्व आठ विद्यापिठात पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये उर्दु माध्यमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.१०,०००/-, रु.८,०००/- व रु.५,०००/- चे पारितोषिक. | रु. २,००,०००/-<br>रु. ४,००,०००/- |
| ११ | उर्दु पत्रकारांसाठी दरवर्षी कार्यशाळेचे आयोजन करणे. | प्रत्येक वर्षी राज्यातील कोणत्याही एका शहरात उर्दु पत्रकारांसाठी एक दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन. सदर कार्यशाळेत तज्ञ पत्रकारांकडून नवोदित पत्रकारांना पत्रकारितेबद्दल मार्गदर्शन. | रु. २,००,०००/- |
| १२ | उर्दु भाषेमधील उल्लेखनिय कामगिरी बद्दल पारितोषिके देण्याबाबत | उर्दु भाषेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांसाठी पात्र व्यक्तींची निवड करण्यासाठी "शोध व निवड समिती" चे गठण.<br>समितीच्या शिफारशीनुसार विविध पुरस्कारांचे वाटप. | रु.१४,००,०००/- |

३. महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांशी संबंधित सर्वसाधारण अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील -

**महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांशी संबंधित सर्वसाधारण अटी व शर्ती :**

३.१ वर नमूद कार्यक्रमांपैकी मुशायरे/नाट्य महोत्सव/मुसन्निफ से मुलाकात या कार्यक्रमांचे आयोजन खुद्द महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत करण्यात यावे.

३.२ शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.संकीर्ण १०१०/प्र.क्र.६८/कोषा.प्र-५, दि.१८/०४/२०११ मधील तरतुदींनुसार, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत केली जाणारी प्रदाने (मानधन/पारितोषिकाची रक्कम/प्रवास भाडे/देयके वा अन्य कोणतेही प्रदान) केवळ इ.सी.एस. द्वारे करण्यात यावीत.

३.३ कोणत्याही परिस्थितीत रोख रक्कमेच्या स्वरुपात वा चेकद्वारे सदरची प्रदाने करण्यात येऊ नयेत.

३.४ वरील अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत पुरवठादार, कवी, लेखक, कलाकार, परीक्षक, विशेष निमंत्रित इ. ना पूर्व कल्पना देण्यात यावी.

३.५ ज्यांना ही अट मान्य नसेल अशा व्यक्तींना पुरवठादार, कवी, लेखक, कलाकार, परीक्षक, विशेष निमंत्रित इ. अशा कोणत्याही स्वरुपात अकादमीच्या कार्यक्रमात सामील करुन घेण्यात येऊ नये.

३.६ महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत शाळा/महाविद्यालयांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी/योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित शाळा/महाविद्यालय हे शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक राहील व यासाठी अर्ज करता शाळांनी त्यांचे DIES क्रमांक नमूद करणे बंधनकारक असेल.

३.७ महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत ग्रंथालयांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी/योजनेत सहभागी होण्यासाठी संबंधित ग्रंथालय हे शासन मान्यता प्राप्त असणे आवश्यक राहील.

३.८ महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमीमार्फत प्रदान केल्या जाणाऱ्या पुरस्कारांच्या बाबतीत, एखाद्या पुरस्कारासाठी सुयोग्य उमेदवार/पुस्तक उपलब्ध होत नसल्यास गुणवत्तेत कोणतीही तडजोड करण्यात येऊ नये. अशी परिस्थिती उद्भवल्यास त्या वर्षी ते पुरस्कार प्रदान करणे बंधनकारक असणार नाही.

४. या योजनेवर तसेच पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी येणारा खर्च हा शासनाकडून महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीला त्या त्या वर्षी मंजूर व वितरीत करण्यात आलेल्या सहायक अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हे आदेश आर्थिक वर्ष २०१६-१७ (दि.१ एप्रिल, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७) पासून लागू होतील.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२०/१४७५, दि.२७/०१/२०१६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१६/व्यय-४, दि.२७/०७/२०१६ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९३०१५४४०६२५१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anees Iqbal Ismail Shaikh

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=447981acddcc5079f9c00eadfad2054d955a80a21de6164c4024daf5a9ea2c97, cn=Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2016.10.05 12:25:46 +05'30'

**( अनिस शेख )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१/२ ( लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. कुलसचिव, विद्यापीठ, मुंबई/पुणे/ नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद/ नांदेड/ नाशिक/ कोल्हापूर.

६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ,
८. सचिव, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ,
९. संचालक, ग्रंथालय संचालनालय,
१०. सर्व विभागीय महसूल आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (अ.वि.वि.) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
१३. स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. अधीक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दु साहित्य अकादमी, मुंबई,
१७. सर्व कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. निवड नस्ती (का-४)/कार्यासन-४, संग्रहार्थ.

## परिशिष्ट "अ"

**अटी व शर्ती :-**

१. वाङःमयीन पुरस्कारासाठी उर्दू वर्तमानपत्राद्वारे जानेवारी ते डिसेंबरच्या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मूळ साहित्य कृती, अनुवादित व एखाद्या साहित्यावर आधारित, शिक्षण, तंत्रज्ञान व संशोधनपर साहित्य कृती, पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील. मात्र डॉक्टरेटसाठी (पी.एच.डी.) प्रसिध्द केलेले निबंध/साहित्य/पुस्तके वाङ्:मय पुरस्कारासाठी विचारात घेतली जाणार नाहीत, अर्थात अशा पुस्तकांना पुरस्कार दिले जात नाहीत.

२. वाङ्:मय पुरस्कारासाठी लेखक/कवी हा महाराष्ट्र राज्यात स्थायी अधिवासी (डोमेसाईल इन महाराष्ट्र) असावा. अर्थात महाराष्ट्रात किमान १५ वर्ष निवास असणे आवश्यक आहे.

३. वाङःमय पुरस्कारासाठी गतवर्षातील जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत प्रसिध्द झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या साहित्य कृती पात्र असतील.

४. वाङःमय पुरस्कारासाठी हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरुपातील साहित्य कृती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. पुरस्कारासाठी विहित नमुन्यातील अर्ज सहा प्रतीसह वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम दिनांकापासून विचारात घेतल्या जातील. त्यानंतर अकादमी कार्यालयात प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अथवा या अर्जासोबत प्राप्त झालेली पुस्तके लेखकास परत केली जाणार नाही.

६. विहीत अर्जासोबत लेखक/कवीने प्रकाशित केलेली साहित्य कृती ही मुळ साहित्य कृती किंवा हे अनुवादित साहित्य असून अनुवादासाठी मुळ लेखकाची अनुमती मिळविल्याच्या परवानगी पत्राची प्रमाणित प्रत पाठविणे आवश्यक आहे.

७. साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेली साहित्य कृती किंवा ज्या साहित्य कृतीस अकादमीने किंवा साहित्य अकादमीने पुरस्कार दिला आहे, अशा साहित्य कृतीमधील काही मजकूर समाविष्ट केलेल्या साहित्य कृती उर्दू अकादमीच्या वाङःमय पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. ज्या साहित्यिकांना/ले-आऊट डिझायनरला २ वर्ष आधी पुरस्कार मिळाला आहे त्याचा चालू वर्षाच्या पुरस्कार योजनेत विचार केला जाणार नाही. तसेच या वर्षात पुरस्कार मिळालेल्या व्यक्तिंचा पुढील २ वर्षासाठी विचार केला जाणार नाही.

९. साहित्य कृतीचे एकापेक्षा अधिक लेखक असतील तर सर्व सह लेखकाची अथवा एका सहलेखकास यापूर्वी वरील अट क्रमांक ८ लागू होत असेल तर अशी साहित्य कृती पुरस्कारासाठी विचारात घेतली जाणार नाही.

१०. दिवंगत लेखकाची साहित्य कृती स्पर्धेसाठी विचारात घेतली जाणार नाही.

११. आत्मचरित्रपर साहित्य कृती संबंधित लेखन स्वतंत्र आहे अथवा ज्याच्या चारित्र्यावर आधारित कृती आहे, अशा लेखकाने अथवा त्यांच्या नातेवाईकांनी लेखी अनुमती दिल्यास अशी साहित्य कृती पुरस्कारासाठी विचारात घेतली जाईल.

१२. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीवर अथवा उर्दू साहित्य अकामदीच्या पुरस्कार समितीच्या सदस्यावर कोणत्याही प्रकारे दबाव आणणारी व्यक्ती उर्दू साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या कोणत्याही पुरस्कारासाठी अपात्र ठरेल. तसेच अशा व्यक्ती पुढे कधीही पुरस्कारासाठी पात्र राहणार नाही.

-=oooOOOOooo=-